# अवघ्या विशीतील रोहन सक्सेनाला गुगल शिष्यवृत्ती

## बिट्स पिलानीचा विद्यार्थी : ७५० अमेरिकन डॉलर्स मिळणार; 'यू-ट्यूब'ला भेट देणार

पणजी, ता. २२ (प्रतिनिधी) : अभियांत्रिकी पदवी पदरात पडण्याआधीच आणि वयाची विशी ओलांडण्यापूर्वीच बिट्स पिलानी (पिलानी कॅम्पस) मध्ये शिकणाऱ्या गोवा निवासी रोहन सक्सेना या विद्यार्थ्याला स्टार्टअपचे वेध लागले आहेत. रोहनला अलीकडेच ७५० अमेरिकन डॉलर्सची प्राप्त झालेली गुगलची शिष्यवृत्ती त्याला भविष्यात उंच भरारी घेण्यास आत्मविश्वास देणारी आहे.

मिरामार येथील शारदा मंदिर स्कूलमधून दहावी व धेंपो उच्च माध्यमिकमधून बारावी उत्तीर्ण झालेला रोहन हा करंजाळे-पणजी येथील निवासी अभियंते, व्यवस्थापन कन्सल्टंट विकास सक्सेना आणि राज्य सरकारच्या ईएसआय डिस्पेन्सरीतील डॉ. रिचा सक्सेना यांचा मुलगा. २०१५ साली गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर रोहनला बिट्स पिलानीत कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत प्रवेश मिळाला. सध्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत तृतीय वर्षाचे शिक्षण घेणारा रोहन पिलानीतील 'असोसिएशन फॉर कॉम्प्युटिंग मशिनरी' (एसीएम) चा सदस्य आहे. भारतात उत्कृष्ट विद्यार्थी विभाग पान २ वर »



### रोहनची भरारी...



अभ्यासू विद्यार्थी असलेल्या रोहनचे शिक्षण पूर्ण करून गोव्यात टेक्नॉलॉजी स्टार्टअप उद्योगात पाऊल ठेवण्याचे स्वप्न आहे. उन्हाळ्यात जर्मनीतील गुगल समर कोड प्रकल्पासाठी रोहनची निवड झाली होती. बॉस्टन अमेरिकेतील स्टीवन वॉलफ्राम बेंटले विद्यापीठातील उन्हाळी प्रशिक्षण उपक्रमासाठी जगातील ७० विद्यार्थ्यांत रोहनची निवड झाली होती. ११ हजार अर्जदारातून रोहनची निवड 'युडेसिटी सेल्फ ड्रायव्हिंग कार उपक्रम' झाली होती. या उपक्रमात निवडण्यात आलेला तो सर्वांत तरुण विद्यार्थी होता.

Scanned by CamScanner

# अवघ्या विशीतील रोहन सक्सेनाला गुगल शिष्यवृत्ती

» पान १ वरून

म्हणून 'एसीएम'ला गेली तीन वर्षे पुरस्कार मिळाला आहे.

गुगलतर्फे वेंकट पंचापकेसन स्मृती शिष्यवृत्तीसाठी रोहनची निवड झाली असून कॉम्प्युटर सायन्स व इंजिनिअरिंग क्षेत्राची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. रोहनचे वडील विकास यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतातील सहा विद्यार्थ्यांची निवड या शिष्यवृत्तीसाठी झाली आहे. या शिष्यवृत्तीअंतर्गत रोहनला ७५० अमेरिकन डॉलर्सचे पारितोषिक मिळणार असून अमेरिकेत कॅलिफोर्नियातील सान ब्रुनो येथील यु ट्यूब मुख्यालयासह यु ट्यूबच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) भेटण्याची संधी त्याला मिळाली आहे. रोहनच्या अमेरिकेला जाण्यायेण्याचा, निवासाचा सर्व खर्च गुगलतर्फे होणार आहे.

Scanned by CamScanner